# मुंबई विद्यापीठ

प्रसिध्दी पत्रक

दिनांक – १६ जून २०१५

## विद्यानगरी परिसरात बास्केट बॉल कोर्टचे अनावरण

## विद्यानगरी परिसरात बहुआयामी इनडोअर हॉल लवकरच

## गुणवंत खेळांडूंचा सत्कार

मुंबई- क्रीडा प्रशिक्षणांसाठी अद्यावत तंत्रज्ञानाची ओळख, साहसी खेळाना प्रोत्साहन आणि क्रीडा विषयक पायाभूत सुविधांचा विकास व क्रीडा वातावरण निर्मितीसाठी मुंबई विद्यापीठ नेहमीच अग्रेसर राहणार असून त्या खेळांसाठी पोषक वातावरण निर्माण व्हावे तसेच मुंबईतील विद्यार्थ्यांची राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर छाप पडावी यासाठी विद्यानगरी परिसरात खेळासाठी पायाभूत सुविधा तयार करण्यावर विद्यापीठ प्रशासन नेहमीच तत्पर असल्याचे प्रतिपादन मुंबई विद्यापीठाचे कुलगुरु डॉ.राजन वेळूकर यांनी केले.आज मुंबई विद्यापीठाच्या विद्यानगरी परिसरात आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात ते बोलत होते.आज विद्यानगरी परिसरात बास्केट बॉल कोर्टचे अनावरण करण्यात आले असून बहुआयामी इनडोअर हॉलचा भूमीपूजन सोहळा पार पडला.याच कार्यक्रमामध्ये मुंबई विद्यापीठातील खेळाडू विद्यार्थ्यांचा सत्कारही करण्यात आला. पुढे बोलतांना कुलगुरु डॉ.राजन वेळूकर म्हणाले की, युवक शारिरीक व मानसिक दृष्टया सदृढ राहावा म्हणून सर्वांसाठी खेळ योजना आणि गरजेनुसार पायाभूत सुविधांच्या निर्मितीवर विद्यापीठ प्रशासनाने प्रामुख्याने भर दिला आहे.विद्यानगरी परिसरात लवकरच बहुआयामी इनडोअर हॉल तयार होणार असून त्यासाठी भारत सरकारच्या युवक व क्रिडा मंत्रालयाकडून मुंबई विद्यापीठास ६ कोटी रुपयाचे अनुदान मंजूर झाले असल्याचे त्यांनी सांगितले.

या योजनेच्या अनुषंगाने अत्याधुनिक सुविधायुक्त बहुआयामी इनडोअर हॉल लवकरच विद्यानगरी परिसरात साकारला जाणार आहे. मुंबई विद्यापीठातील खेळाडूंना राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर नावलौकीक करण्यासाठी येथील पायाभूत सुविधा नक्कीच फायदेशीर ठरणार असून या सोयी –सुविधा मुंबईतील सर्व खेळांडूना उपलब्ध करुन दिल्या जाणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

विद्यापीठातील सलंग्नित महाविद्यलयातील विद्यार्थ्यांनी राज्य,राष्ट्रीय आणि आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर मुंबई विद्यापीठाचे नाव कोरले असून अशा गुणवंत खेळाडू विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा क्रिडा संकुलात आयोजित करण्यात आला होता.या सत्कार सोहळ्यासाठी अर्जून पुरस्कार विजेते कमलेश मेहता आणि मोनालिसा बरुआ यांच्या हस्ते गुणवंत खेळांडूचा सत्कार करण्यात आला. यामध्ये मल्लखांब,कबड्डी,खो-खो,क्रिकेट,वेट लिफ्टींग,पॉवर लिफ्टींग,बास्केट बॉल,पॉवर लिफ्टींग,आणि स्विमींग इ.खेळात प्राविण्य मिळविणा-या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाला मुंबई

विद्यापीठाचे बीसीयुडी संचालक डॉ.राजपाल हांडे,कुलसचिव डॉ.एम.ए.खान,विविध प्राधिकरणातील सदस्य आणि प्राध्यापक वर्गासह अनेक विद्यार्थी उपस्थित होते.

## बहुआयामी इनडोअर हॉलची वैशिष्ट्ये-

- ६०*४० चौ.मीटर क्षेत्रफळाचा व १४.५ मीटर उंचीचा बहुआयामी इनडोअर हॉल
- ६०*२५ चौ.मी.क्षेत्रफळाचे जिम्नॅशिअम
- सुमारे १००० लोकांना सामावून घेणारे व  जिमनॅशिअमधील खेळ सुस्पष्ट दिसण्यासाठी कॉलम नसणारे प्रेक्षागृह
- ५० मुलांसाठी व मुलींसाठी स्वतंत्र अशी डॉर्मिटरी

लीलाधर बन्सोड,उपकुलसचिव (जनसंपर्क)